17 MAR 2018 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तणावमुक्तीसाठी संगीत सर्वोत्तम उपाय

## डॉ. विलास नांदवडेकर

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
धकाधकीच्या जीवनात तणावमुक्तीसाठी संगीत सर्वोत्तम उपाय आहे. त्यामुळे प्रत्येकाने संगीताचा आस्वाद घेत निरामय आयुष्य जगावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे आयोजित दोनदिवसीय संगीत नाटक महोत्सवाचे उद्घाटन त्यांच्या उपस्थितीत, तर ज्येष्ठ तबला वादक पंडित आनंद बदामीकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी प्रख्यात चित्रकार बबन माने आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी रेखाटलेल्या चित्रशिल्प प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. नांदवडेकर आणि बदामीकर यांच्या हस्ते झाले. यानंतर महोत्सवाच्या पहिल्या सत्रात पंडित आनंद बदामीकर यांनी सोलो तबला वादन आणि तबल्याची उत्पत्ती, विविध प्रकारचे ताल, मात्रा आणि तबल्यामधील विविध शैली घराणी याबद्दल पंडित आनंद बदामीकर यांनी विस्तृत मार्गदर्शन केले. त्यांना अमित साळोखे यांनी संवादिनीवर साथ केली.

दुसऱ्या सत्रात ॲड. आर. एस. सबनीस यांचा एकल यांचा हार्मोनियम वादनाचा कार्यक्रम झाला. विविध नाट्यगीत आणि बंदिशी सादर करून त्यांनी रसिकांची मने जिंकली. त्यांना मधुसूदन शिखरे यांनी तबल्यावर साथ केली. सायंकाळच्या सत्रात डॉ. भारती वैशंपायन यांच्या शास्त्रीय संगीताची मैफल रंगली. विविध रागांमध्ये गंधार आणि शडज यांची गुंफण करून अनेक रचना त्यांनी सादर केल्या. सुमारे तीन तासाहून अधिक काळ चाललेल्या या मैफलीला कानसेनांना स्वरसमाधीची अनुभूती दिली. त्यांना तबल्यावर केदार वैशंपायन आणि संवादिनीवर संदीप तावरे यांनी साथ दिली.

विभागप्रमुख डॉ. एन. व्ही. चिटणीस यांनी प्रास्ताविकात विभागाचा इतिहास आणि वाटचालीचा आढावा घेतला. कोल्हापूरच्या कला परंपरेला समृद्ध बनविण्याचे काम संगीत व नाट्यशास्त्र विभाग निष्ठेने करत असल्याचे डॉ. चिटणीस यांनी नमूद केले.

यावेळी प्रा. एन. व्ही. चिटणीस, डॉ. अंजली निगवेकर, डॉ. विनोद ठाकूरदेसाई, निखिल भगत, माजी विभागप्रमुख डॉ. शुभदा वायंगणकर, सतीश कुसुंबे, शिवाजी झोरे, स्वरूपा मोरबाळे, यशवंत वणिरे, डॉ. आनंद धर्माधिकारी, दीपक दाभाडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAR 2018
पुढारी

# तणावमुक्तीसाठी संगीत सर्वोत्तम उपाय : डॉ. नांदवडेकर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

संगीत हे मानवाचे जगणे सुसह्य करते. आजच्या धकाधकीच्या जीवनात तणावमुक्तीसाठी संगीत हाच सर्वोत्तम उपाय आहे. त्यामुळे प्रत्येकाने संगीताचा आस्वाद घेत निरामय आयुष्य जगावे, असे प्रतिपादन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने दोनदिवसीय संगीत नाटक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. ज्येष्ठतबलावादक पंडित आनंद बदामीकर यांच्या हस्ते द्रीपप्रज्वलनाने उद्घाटन झाले. यावेळी विभागप्रमुख प्रा. डॉ. एन. व्ही. चिटणीस, अमित साळोखे, आर. एस. सबनीस, डॉ. सौ. भारती वैशंपायन, डॉ. अंजली निगवेकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
1 7 MAR 2018 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दीक्षान्त समारंभ विद्यार्थ्यांसाठी निवेदन

Estd-1962
NAAC 'A' Grade

- विद्यापीठाचा ५४ वा दीक्षान्त समारंभ विद्यापीठाच्या प्रांगणामध्ये सोमवार दि. १९ मार्च, २०१८ रोजी सकाळी ११ : ०० वाजता संपन्न होत आहे. या समारंभासाठी प्रमुख पाहुणे मा. श्री ए. एस. किरणकुमार विक्रम साराभाई डिस्टिंग्विश्ड प्रोफेसर ईस्त्रो हे उपस्थित राहणार आहेत.
- आक्टोबर/नोव्हेंबर २०१६ आणि मार्च/एप्रिल २०१७ मध्ये झालेल्या अंतिम वर्षाच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण व पात्र ज्या विद्यार्थ्यांनी दीक्षान्त समारंभास उपस्थित राहून पदवी स्विकारण्याचा विकल्प (In Person) विद्यापीठाच्या संकेत स्थळावर ऑन लाईन जून २०१७ नंतर दिलेला आहे त्यांची पदवी प्रमाणपत्रे दीक्षान्त समारंभादिवशी सकाळी ७:३० ते १० : ३० व कार्यक्रमानंतर दुपारी १ : ३० ते सायंकाळी ६ : ३० या वेळेमध्ये परीक्षा भवन क्रमांक २ समोरील मंडपामध्ये वितरित करण्यात येतील.
- ज्या विद्यार्थ्यांनी टपालाद्वारे पदवी स्विकारण्याचा विकल्प (In Absentia) विद्यापीठाच्या संकेत स्थळावर पोस्टाद्वारे (ऑन लाईन) दिलेला आहे, आणि ज्या विद्यार्थ्यांनी पदवी स्विकारण्याचा कोणताही विकल्प विद्यापीठाच्या संकेत स्थळावर दिलेला नाही त्यांची पदवी प्रमाणपत्रे दीक्षान्त समारंभानंतरच्या एक महिन्यानंतर त्यांना दीक्षान्त प्रमाणपत्र मिळण्यासाठी केलेल्या अर्जावरील पत्त्यावर पोस्टाने पाठविण्यात येतील.
- वरीलप्रमाणे विद्यार्थ्यांची In Person/ In Absentia अशी स्वतंत्र यादी दीक्षान्त नंबर व नांवासह विद्यापीठाच्या संकेत स्थळावर www.unishivaji.ac.in येथे उपलब्ध आहे. सदरची यादी पाहून विद्यार्थ्यांनी आपला दीक्षान्त नंबर माहिती करून घ्यावा. दीक्षान्त क्रमांक माहिती करून घेतल्याने पदवी त्वरित देणे सोयीचे होते.
- जे विद्यार्थी दीक्षान्त समारंभामध्ये पदवी प्रमाणपत्र उपस्थित राहून (In Person) स्विकारणार आहेत त्यांनी आपल्या सोबत आपले महाविद्यालयाचे ओळखपत्र/निवडणूक आयोग ओळखपत्र/ ड्रायव्हिंग लायसेन्स /पॅनकार्ड आधार कार्ड यापैकी कोणतेही ओळखपत्र आणणे आवश्यक आहे. पदवी प्रमाणपत्र हे महत्त्वाचे कागदपत्र असलेने ओळखपत्राखेरीज ते दिले जाणार नाही.
- उपस्थित राहून पदवी स्विकारण्याचा विकल्प दिलेल्या विद्यार्थ्यांनी स्वत: उपस्थित असणे आवश्यक आहे. अन्य कोणास प्रमाणपत्र घेण्यासाठी पाठविल्यास त्याचेकडे अधिकारपत्र देणे आवश्यक आहे.

**दीक्षान्त विभाग**
दि. १७/३/२०१८

**श्री महेश काकडे**
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAR 2018
Times of India

# Varsities told to celebrate Yoga Day on June 21

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The University Grants Commission (UGC) has reminded the universities across India to celebrate fourth International Day of Yoga (IDY) on June 21 with more active participation.

In a letter, dated March 13, UGC secretary Rajnish Jain asked vice-chancellors of the universities across the country to observe the IDY on June 21 and participate in Yoga demonstrations along with organisation of quiz competition, yoga trainings, among others.

The circular stated that it has been decided to celebrate IDY 2018 in a befitting manner by adopting activities such as building a culture and environment for yoga in universities and colleges and other higher education institutions (HEIs), organising quiz competitions, lectures and special yoga demonstrations, debates, seminars and workshops, wellness centres, poster presentations and research paper presentations.

Jain has asked the officials to disseminate and give wide publicity for celebrations of IDY-2018 as a run-up activity on two select dates in the month of March and in May.

He also said the UGC has created a university activity monitoring portal to enable the HEIs provide details on the activities carried out on IDY and other future events. The institutions have to fill in the details on the same by June 22.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAR 2018
महाराष्ट्र टाईम्स



## विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या स्मरणार्थ छ. शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र यांच्यातर्फे डॉ. आप्पासाहेब पवार व्याख्यानमाला शनिवारी (ता. १७ मार्च) होणार आहे. विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागामधील सेमीनार हॉलमध्ये हा कार्यक्रम होणार आहे. या व्याख्यानमालेसाठी महाराष्ट्र पुरात्व वस्तू संग्रहालय खात्याचे संचालक डॉ. तेजस गर्गे यांचे 'मराठाकालीन किल्ल्यांचे स्थापत्यशास्त्र व त्यांचे संवर्धन' या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. गडकोट, जलदूर्ग यांच्या मराठा शैलीच्या स्थापत्यशास्त्र व मराठा कालीन तोफा व दारूगोळा या विषयावर सकाळी साडेअकरा ते दुपारी अडीच या वेळेत व्याख्यान होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAR 2018
पुण्यनगरी

# विद्यापीठात आज व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या स्मरणार्थ छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रातर्फे घेण्यात येणारे डॉ. आप्पासाहेब पवार व्याख्यान विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागामधील सेमिनार हॉलमध्ये शनिवार, दि. १७ रोजी आयोजित करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेसाठी महाराष्ट्र पुरातत्त्व वस्तुसंग्रहालय खात्याचे संचालक डॉ. तेजस गर्गे यांचे 'मराठाकालीन किल्ल्यांचे स्थापत्यशास्त्र व त्यांचे संवर्धन' विषयावर व्याख्यान होणार आहे. या व्याख्यानमालेद्वारे मराठा इतिहासाचे विविध पैलूंवर प्रकाश टाकण्यात येणार आहे. या उद्देशानेच डॉ. तेजस गर्गे यांचे गड संबंधित तसेच गडकोट, जलदुर्ग यांच्या मराठा शैलीच्या स्थापत्यशास्त्र व मराठाकालीन तोफा व दारूगोळा या विषयावर व्याख्यानमालेची तीन पुष्पे शनिवारी ११.३० ते २.३० या वेळेत गुंफली जाणार आहेत.

1 7 MAR 2018
महाराष्ट्र टाईम्स

# प्रा. अरुण भोसले यांचे व्याख्यान

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राला पुरोगामी चेहरा दिला. देशाच्या जडनघडणीत त्यांचे योगदान मोठे आहे. त्यांचे जीवन, कार्य आजही प्रेरणादायी आहे', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. अरूण भोसले यांनी केले.

यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कै. श्रीपतराव बोंद्रे स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते. 'यशवंतराव चव्हाण यांचे जीवन व कार्य' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे अध्यस्थानी होते. शिक्षण संस्थेचे मानद सचिव विजयराव बोंद्रे यांची प्रमुख उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. मोरे यांचेही याप्रसंगी भाषण झाले. यावेळी प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी व्याख्यानमालेचा हेतू स्पष्ट केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 7 MAR 2018
पुण्यनगरी

# प्रा.डॉ.टी.एस.भोसले यांची अभ्यासक मंडळावर निवड

**शिरोळ / प्रतिनिधी**



शिरटी (ता.शिरोळ) येथील प्रा. डॉ. टी. एस.भोसले यांची शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र या विषयासाठी बोर्ड ऑफ स्टडीज (अभ्यासक मंडळ) या पदावर निवड झाली. सध्या प्रा.डॉ.भोसले हे रामानंद नगर (बुरली ) किर्लोस्करवाडी येथे रयत शिक्षण संस्थेच्या ए.एस.सी. कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून सेवाकार्यात आहेत. दरम्यान या निवडीबद्दल रामानंदनगर कॉलेजचे प्राचार्य एस.टी. साळुंखे यांच्या हस्ते व महाविद्यालयीन सेवक कर्मचारी यांच्या उपस्थितीत प्रा.डॉ.भोसले.यांचा सत्कार करण्यात आला.